Impact Factor - 6.261
ISSN - 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February - 2019
SPECIAL ISSUE- 159

# Dr. Babasaheb Ambedkar : Versatile Personality



**Guest Editor :**
Dr. Manjushree Bobade
Principal,
Rayat Shikshan Sanstha's
Dr. Babasaheb Ambedkar College,
Aundh, Pune 411 067

**Executive Editor of the issue :**
Dr. Vilas Sadaphal
Dr. Supriya Pawar
Prof. Eknath Zaware
Dr. Tanaji Hatekar
Prof. Kiran Kumbhar

**Chief Editor :**
Dr. Dhanraj T. Dhangar
Yeola, Dist. Nashik (MS) India.

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

ISSN : 2348-7143
February-2019

## INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Dr. B.R.Ambedkar and Indian Constitution | Dr. Nalini Waghmare | 07 |
| 2 | Dr. Ambedkar's Thoughts on Women Empowerment | D. L. Khokale | 11 |
| 3 | Dr. Babasaheb Ambedkar's Thoughts on Annihilation of the Castes in Present Context | Dr. Rajendra N. Raskar | 14 |
| 4 | Dr. Babasaheb Ambedkar & Women Empowerment in India | Mrs. Vaishali Supekar | 16 |
| 5 | Dr. Ambedkar's Thoughts on Education | Tipusultan Inamdar | 19 |
| 6 | Dr. B. R. Ambedkar's Views on Democracy | Tansen Randive | 22 |
| 7 | Dr. Ambedkar's Thought on Education | Dr. V. D. Awari | 24 |
| 8 | Dr. Babashaeb Ambedkar : Versatile Personality | Sunil Kamble | 26 |
| 9 | भारतीय मविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर | श्री. जीवन आयरे | 28 |
| 10 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण विषयक विचार | प्रा.मेघराज औटी | 31 |
| 11 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर : बहुआयामी व्यक्तिमत्त्व | डॉ. ज्योती बिडलान | 33 |
| 12 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार | डॉ. संजीव बोडखे | 37 |
| 13 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेली परिवर्तनवादी चळवळ आणि दलित स्त्रीवादी भूमिपृष्ट | डॉ. सुचित्रा नाईक | 40 |
| 14 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार आणि सद्य:स्थिती | डॉ. संजय गायकवाड | 47 |
| 15 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातीव्यवस्थेबद्दलचे विचार | डॉ. मनीषा जगदाळे | 50 |
| 16 | भारतीय रिझर्व बँकेच्या स्थापनेत डॉ. आंबेडकर यांचे योगदान | डॉ. जगदीश लांजेकर | 53 |
| 17 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही विषयक विचार | डॉ. विलास सदाफळ व प्रा.किरण कुंभार | 59 |
| 18 | भारतीय संविधान आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर | डॉ. संतोष कदम | 62 |
| 19 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रविषयक दृष्टीकोण | डॉ. विठ्ठल केदारी | 66 |
| 20 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिला विषयक विचार | डॉ. अनिल कोकाटे | 70 |
| 21 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार | प्रा. महेश कुलकर्णी | 73 |
| 22 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नेतृत्व आणि दलित चळवळ | डॉ. रघुराज कुरुमकर | 77 |
| 23 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार | डॉ. संजय लांडगे | 79 |
| 24 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची वर्ग आणि वर्णीय संकल्पना | प्रा. नागराज मगरे | 82 |
| 25 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जातीनिर्मुलनविषयक विचारांची प्रस्तुतता | सचिन ओहोळ | 86 |
| 26 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कृषी व शेतकऱ्यांसंबंधी विचारांचा अभ्यास | डॉ. पराग पाटील | 88 |
| 27 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राज्यघटनेविषयी विचार | प्रा. अविनाश फलके | 92 |
| 28 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रवाद | नवनाथ राठोड | 95 |
| 29 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार | डॉ. राजकुमार रिकामे | 98 |
| 30 | भारतीय जातीव्यवस्था आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर | डॉ. जयपाल सावंत | 100 |
| 31 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संरक्षणविषयक धोरण | डॉ. बी. डी. तोडकर | 106 |
| 32 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय भूमिकेच्या वैचारिक अधिष्ठानांचा अभ्यास | प्रा. स्वाती साळवे | 112 |
| 33 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता | प्रा. एकनाथ झावरे | 115 |

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 159 - Dr. Babasaheb Ambedkar : Versatile Personality | February-2019
UGC Approved Journal

# भारतीय जातीव्यवस्था आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर

डॉ. जयपाल चंद्रकांत सावंत
शंकरराव जगताप आर्टस् अँण्ड कॉमर्स कॉलेज वाघोली, ता. कोरेगाव, जि.सातारा

"सर्व माणसे जन्मत: समान दर्जाची आहेत. ती मरेपर्यंत समान दर्जाचीच राहतील. हे हक्क कायम रहावेत हाच व्यवस्थेचा व राज्यव्यवस्थेचा अंतिम हेतू असला पाहीजे

अखिल प्रजा, जनता हेच सर्व अधिकारांचे व सत्तेचे उगमस्थान आहे. कोणत्याही व्यक्तीला आपल्या जन्मसिध्द हक्काप्रमाणे वागण्यास स्वातंत्र्य आहे.

जातिजातीत ठरवून दिलेल्या असमान व्यवस्थेचा ही सभा धिक्कार करते

समाजरचना समानतेच्या पायावर उभी करावयाची असल्यामुळे, मानसन्मान, अधिकार, व्यवसाय यांच्या बाबतीत जात आड येता कामा नये. भेदाभेद व्हावयाचा तो केवळ व्यक्तीच्या गुणभेदामुळेच झाला पाहीजे जातीमुळे होता कामा नये."

महाड सत्याग्रहाच्या सभेमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण
दि.२५.१२.१९२७

प्राचीन भारताचा अभ्यास करताना ज्या वेदांचा आधार घेतला जातो त्या वेदामधील सर्वात पहिला वेद ग्वेद होय. या ग्वेदाच्या दहाव्या मंडलातील पुरूषसुक्तामध्ये वर्णव्यवस्थेचा पहिला उल्लेख आजवरच्या संशोधकांना आढळलेला आहे. या पुरूषसुक्तानुसार ब्रम्हदेवाने आपल्या मुखातून ब्राम्हण, बाहुतून क्षत्रिय, मांडयातून वैश्य आणि पायातून शुद्र निर्माण केले. हिंदू धर्मातील या विभाजनामुळे या धर्मात जो व्यक्ती जन्म घेत असे त्याच्या जन्मापासूनच त्याची योग्यअयोग्यता आणि पवित्रअपवित्रता सिध्द होत असे. या विभाजनानुसार व्यक्तीची कामेही विभाजित करण्यात आली आणि ब्राम्हण अध्ययन अध्यापन, क्षत्रिय संरक्षण, वैश्य शेती, व्यापार व शुद्र या तिन वर्णाची सेवा करणे. या विभाजनामुळे ब्राम्हण वर्ग स्वत:ला श्रेष्ठ समजत होताच परंतु कालातराने ब्राम्हणेतर वर्गही स्वत:ला श्रेष्ठ समजू लागला. या धर्माने ठरवून दिलेल्या विभाजनामुळे आता शुद्र वर्गाची स्थिती दयनिय झाली.उच्च स्तरावर असणाया ब्राम्हण वर्णियाचे कल्याण झाले तर ब्राम्हणेतर जन्माने ब्राम्हणांपेक्षा कमी दर्जाचे होते परंतु त्यांना विद्या व संपत्ती मिळवण्याचे अधिकार काही प्रमाणात का होइना परंतु होते. या विभाजनामुळे ज्या वर्गाचे सर्वाधिक हाल झाले तो वर्ग म्हणजे बहिष्कृत असणारा अस्पृश्य वर्ग होय. कारण या वर्गाला वेद व त्या नंतरच्या अनेक धार्मिक ग्रंथांनी जन्मजात अयोग्य व अपवित्र घोषीत केले. आणि यांना कोणत्याही प्रकारच्या सोईसुविधा आणि हक्क मिळणार नाहीत याची काळजी घेण्यात आली. व्यापार, नोकरी किंवा शेती इत्यादी संपत्ती प्राप्त करण्याचे कोणतेही मार्ग त्यांना खुले ठेवण्यात आले नाहीत की ज्यायोगे हा बहिष्कृत असणारा वर्ग कधीही सबल होऊ नये. तसेच जर कोणी अस्पृश्याने विद्या अथव संपत्ती या संदर्भाने सबल होण्याचा प्रयत्न केला तर त्याला राज्यव्यवस्थेने अडवावे अशा प्रकारची रचनाच करून घेण्यात आलेली होती. या आपल्या अवनितीला कारणीभूत आपले नशिबच आहे व त्यात काही केले तरीही बदल होणार नाही त्यामुळे येईल तो दिवस निमुटपणे सहन करणे हाच त्यावरील मार्ग आहे असे मानून अस्पृश्य समाज हजारो वर्ष पिढयानपिढया जगत आला.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 159 – Dr. Babasaheb Ambedkar : Versatile Personality
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

जातीव्यवस्था :

जात म्हणजे काय? : भारतीय जातीसंस्थेला जात हे नामाभिदान देण्याचे कार्य प्रथमत: लोकांनी केले. भारतातील सामाजिक वर्गवारी स्पष्ट करण्यासाठी त्यांनी जात हा शब्द वापरला. मते जात ही संकल्पना भारतीयांनी आपल्या रक्तातील शुध्दता कायम ठेवण्यासाठी वापरलेली आहे.एस.व्ही.केतकर यांनी भेजवतल वफ ब्जम पद प्दकप या ग्रंथात जात या शब्दाची माहीती देताना म्हणतात, **Caste** या शब्दाचा उगम स्पॅनिश व लोकांनी प्रथमत: वापरला. हा शब्द त्यांनी शुध्दता हा शब्द पंधराव्या शतकाच्या मध्यकालात स्पॅनिश लोकांनी जात या शब्दासाठी **Caste** हा शब्द वापरला आहे. खरे तर हा शब्द The word caste : This is of Spanish and Portuguese origin. Casta means pure. The Spaniards were the first to use it but its Indian Application is from Portuguese, who had so applied it in the middle of the fifteenth century. याच ग्रंथात जातीची व्याख्या मांडताना ते म्हणतात"a social group having two characteristics: (i) membership is confined to those who are born of members and includes all persons so born ; (ii) the members are forbidden by an inexorable social law to marry outside the group".[3]

तर्कतिर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या वैदिक संस्कृतीचा विकास या ग्रंथातम्हणतात, "प्राचिन काळी दळणवळनाची साधने अल्प असल्यामुळे लग्न आणि पौराहित्य संबंध दुरच्या ठिकाणी होत नसत कारण दुरच्या प्रदेशातील माहीती मिळण्यास अडचणी निर्माण होत असत त्यामुळे जवळच्या प्रदेशात लग्नसंबंध केले जात असत. हे ज्ञात असलेले म्हणून संबंध योग्य असे क्षेत्र जाती होय". जेंव्हा एखादा वर्ग हा पुर्णपणे अनुवांशिकतेवर आधारित असतो तेंव्हा त्या वर्गास जात असे म्हणतात अशी व्याख्या कुले यांनी केली तर डॉ. इरावती कर्वे यांच्या मते विस्तृत संबंध असणाया आंतरविवाही समूह म्हणजे जात तर मॅक्स वेबरच्या मते ब्जम पे कवनइजसमेसल ' बसवेमक हतवनचण[2] या सर्व विचारवंतांनी जातीची व्याख्या आपआपल्या पध्दतीने केलेली आहे. या सर्व व्याख्यांमध्ये आढळणारे सुत्र म्हणजे "ज्या विशिष्ट संघामध्ये प्रवेश जन्मानेच होतो आणि अन्य कोणत्याही कारणाने होत नाही व ज्या संघातील लोकास त्या संघाबोबर लग्न करता येत नाही त्या संघास जाती म्हणावे."[3] डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी CASTES IN INDIA Their Mechanism, Genesis and Development या ग्रंथात सेनार्ट, नेशफिल्ड, रिश्ले आणि डॉ.केतकर यांच्या जातीव्यवस्थेच्या व्याख्या दिलेल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे आहेत.[4]

सेनार्ट : सेनार्ट यांनी जातीसंदर्भात मांडलेले मत पुढीलप्रमाणे "जाती अनुवांशिकतेच्या दृढ बंधनांनी बांधलेली एक घनिष्ट संस्था होय. या संस्थेला रूढीने चालत आलेली स्वतंत्र जातपंचायत असते. या जातपंचायतीला प्रमुख असतो. विशिष्ट सणाच्या वेळी अथवा विशेष प्रसंगी या पंचायतीची बैठक असते. जात ही एका विशिष्ट व्यवसायाशी निगडीत असते. या जातीतील लोकसमुहाचा परस्परसहसंबंध मुख्यत: रोटीबेटी व्यवहारांनी आणि सार्वजनिक उत्सवांनी नियंत्रित होत असतो. या समुहाच्या विटाळाच्या मर्यादा वेगवेगळया असतात मात्र समाजाच्या प्रमुख व्यक्तिला विशिष्ठ प्रकारचे दंड ठोठावण्याचा अधिकार असतो. या अधिकारात जातीबहिष्कृत करण्याचा अनिर्बंधीत अधिकारही दिलेला असतो. "Mr. Senart, a French authority, defines a caste as "a close corporation, in theory at any rate rigorously hereditary : equipped with a certain traditional and independent organisation, including a chief and a council, meeting on occasion in assemblies of more or less plenary authority and joining together at certain festivals : bound together by common occupations, which relate more particularly to marriage and to food and to questions of ceremonial pollution, and ruling its members by the exercise of jurisdiction, the extent of which varies, but which succeeds in making the authority of the community more felt

by the sanction of certain penalties and, above all, by final irrevocable exclusion from the group".

नेसफिल्ड : नेसफिल्ड जातीला लोकांचा समूह मानतात.त्यांचा इतर लोकांच्या कोणत्याही समुहाशी लग्न आणि भोजन या गोष्टींबाबत कोणताही परस्परसंबंध नसतो. या लोकसमुहातील व्यक्ती फक्त आपल्या समुहातील लोकांच्यापुरते वरील संबंध मर्यादित ठेवतात. Mr. Nesfield defines a caste as "a class of the community which disowns any connection with any other class and can neither intermarry nor eat nor drink with any but persons of their own community". H. Risley, "a caste may be defined as a collection of families or groups of families bearing a common name which usually denotes or is associated with specific occupation, claiming common descent from a mythical ancestor, human or divine, professing to follow the same professional callings and are regarded by those who are competent to give an opinion as forming a single homogeneous community".

एस.व्ही.केतकर यांनी History of Caste in India या ग्रंथात जात या शब्दाची माहीती देताना म्हणतात, कास्ट या शब्दाचा उद्‍गम स्पॅनिश व भाषेतून आहे. कास्टा म्हणजे शुध्द. हा शब्द स्पॅनिश लोकांनी पहिल्यांदा वापरला असला तरीही पंधराव्या शतकाच्या मध्यकाळात भारतासंदर्भात पोतुगिजांनी सर्वप्रथम वापरला आहे. The word caste : This is of Spanish and Portuguese origin. Casta means pure. The Spaniards were the first to use it but its Indian Application is from Portuguese, who had so applied it in the middle of the fifteenth century.[5] एस.व्ही.केतकर यांच ग्रंथात जातीची व्याख्या मांडताना ते म्हणतात, जात ही सामाजिक संस्था आहे आणि तिची दोन वैशिष्टये आहेत. १. जातीचे सदस्यत्व हे केवळ त्याच जातीत जन्माला आलेल्या लोकांपुरते मर्यादित असते आणि जातीत जन्मास आलेल्या सर्वांचा त्यात समावेश होत असतो. "a social group having two characteristics: (i) membership is confined to those who are born of members and includes all persons so born ; (ii) the members are forbidden by an inexorable social law to marry outside the group".[6]

डॉ.आंबेडकरांच्या मते, "जात म्हणजे एक असे सामाजिक संघटन आहे की ज्यामध्ये १.नियमबध्द असणारी हिंदू धर्मावरील श्रध्दा २.विवाह ३.भोजन ४.व्यवसाय या प्रमुख चार नियमांचा समावेश आहे. यामध्ये 'समान नाव असलेले सामाजिक गट' याचीही आपण भर घालू शकतो."[7] ("A caste may be defined as a social group having (a) belief in Hindu Religion and bound by certain regulations as to, (b) marriage, (c) food and (d) occupation. To this one more characteristic may be added namely a social group having a common name by which it is recognized.") जातीच्या या वैशिष्टयांच्या आधारे डॉ.आंबेडकर जातीसंस्थेचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करतात. अ.जेंव्हा व्यक्तिच्या लग्नाचा संबंध येतो तेंव्हा व्यक्तिने त्या जातीने घालून दिलेल्या नियमांचे पालन करणे अत्यावश्यक असेल. कोणत्याही परिस्थीतीत कोणत्याही दोन विभिन्न जातीच्या सदस्यांचा विवाह होऊ शकत नाही. किंबहुना याच नियमावर जातीव्यवस्था आजवर उभी राहीलेली आहे-("In the matter of marriage the regulation lays down that the caste must be endogamous. There can be no intermarriage between members of different castes. This is the first and the most fundamental idea on which the whole fabric of the caste is built up.")

ब.ज्यावेळी भोजनाबाबतचा नियम पाहतो तेंव्हा जे लोक आपल्या जातीचे असतील तेच सहभोजन करू शकतात. म्हणजेच ज्या समुहात अंतर्गत विवाह होऊ शकतो तेच एकत्र भोजन करू शकतात. ("In the matter of food the rule is that a person cannot take food from and dine with any person who does not belong to his caste. This means that only those who can intermarry can also interdine. Those who

cannot intermarry cannot interdine. In other words caste is an endogamous unit and also a communal unit.")

क. व्यवसायाच्या नियम म्हणजे व्यक्तिचा जो पिढीजात व्यवसाय चालत आलेला आहे तोच व्यवसाय त्याने करावा. आणि एखादे प्रसंगी जर त्या जातीकडे व्यवसाय नसेल तर त्याच्या पित्याचाच व्यवसाय व्यक्तिने केला पाहिजे. ("In the matter of occupation the regulation is that a person must follow the occupation which is the traditional occupation of his caste and if the caste has no occupation then he should follow the occupation of his father.")

ब.व्यक्तिचा दर्जा जेंव्हा पाहीला जातो तेंव्हा व्यक्ती ज्या जातीत जन्माला आलेली आहे त्या जातीची प्रतिष्ठा ही कायमस्वरूपी आणि वंशपरंपरेने त्यास प्राप्त होत असते. हिंदू व्यक्ती ज्या जातीत जन्म घेतो त्याच जातीची प्रतिष्ठा त्यास प्राप्त होते. कोणताही हिंदू व्यक्ती त्याची जात बदलू शकत नाही आणि जात बदलता येत नसल्याने त्याची प्रतिष्ठाही बदलत नाही. हिंदू जन्माला येतानाच एका जातीचा सदस्य म्हणून येतो आणि त्याचा मृत्यूही त्याच जातीत होत असतो.हिंदू व्यक्तीने त्याची जात गमावली तर तो त्याचा दर्जाही गमावतो परंतू त्यास आहे त्या दर्जापेक्षा उत्तम दर्जाची जात किंवा दर्जा प्राप्त होऊ शकत नाही. ("In the matter of status of a person it is fixed and is hereditary. It is fixed because a person's status is determined by the status of the caste to which he belongs. It is hereditary because a Hindu is stamped with the caste to which his parents belonged, a Hindu cannot change his status because he cannot change his caste. A Hindu is born in a caste and he dies a member of the caste in which he is born. A Hindu may lose his status if he loses caste. But he cannot acquire a new or a better or different status.")

**जातीसंस्थेचा उदय :**

चातुवर्ण व्यवस्थेचा सर्वात पहिला उल्लेख ऋवेदाच्या पुरूषसुक्तामध्ये आहे. याप्रमाणे प्रजापतीच्या मुखातून ब्राम्हण बाहूतून क्षत्रिय मांडयांपासून वैश्य आणि पायापासून शुद्र निर्माण झालेले आहेत. अशर्ववेद, पंचविश ब्राम्हण ग्रंथ, वाजस्नेही संहीता, तैत्तिरिय अराण्यक, महाभारत, वायूपुराण, मार्कंडेय पुराण, विष्णू पुराण, वशिष्ठ धर्मसुत्रे, बौध्दायन धर्मसुत्रे, मनुस्मृती आणि याज्ञवल्क्य स्मृती या विविध ग्रंथात हीच संकल्पना थोडयाफार फरकाने चर्चीलेली आहे.

वेदकाळात जाती अस्तित्वात होत्या कि नव्हत्या याबाबत विचारवंतामध्ये मतभेद आहेत. जात या संकल्पनेत वर्णाचा अंतर्भाव करून वेदकाळात जातीसंस्था अत्यंत कर्मठ स्वरूपात असल्याचे मत डनपतए Zjmmer, weber, Raguzln आणि Dr.Ghurye यांनी मांडलेले आहे तर ००.००००, ००००, ००.०००० आणि क्तण त्रिंजम यांनी या कालखंडात जातीप्रथा अस्तित्वात नव्हती असे मत मांडलेले आहे. क्तण्ध्दह यांच्या मते या कालखंडात गुणकर्मावरून वर्ण ठरत असे व एका वर्णातून दुसऱ्या वर्णात जाता येत असे.[६]

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर** : जातीसंस्थेचा उदय भारतात कसा झाला या विषयावर आपले मत मांडताना कास्टस् इन इंडीया या ग्रंथात जातीची निर्मिती कशी झाली हे सांगताना म्हणतात, Bthe final analysis creation of Castes, so far as India is concerned, means the superposition of endogamy on exogamy." म्हणजेच स्वगटाअंतर्गत विवाहपध्दतीचा गटबाहय विवाहपध्दतीवर वरचष्मा झाल्यामुळेच निदान भारतात तरी जातींची निर्मीती झाली आहे.[७]

**भारतीय जातीसंस्थेची वैशिष्ठये :**

खरे पाहीले असता भारतीय जातीसंस्थेचा अन्वयार्थ समजण्यासाठी आपणाला या संकल्पनेची वैशिष्ठयांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. भारतीय जातीव्यवस्थेची अशी काही वैशिष्ठये आहेत की ज्यांना

अभ्यासल्याशिवाय जात ही संकल्पनाच समजणे अवघड आहे. According to Ghurye the outstanding features of Hindu society when it was ruled by the social philosophy of Caste, unaffected by the modern ideas of rights and duties, may be discerned to be six :(1) Segmental division of society 2. Hierarchy 3. Restrictions on feeding and social intercourse 4. Civil and religious disabilities 5. Lack of unrestricted choice of occupation 6. Restriction on marriage. [१०] तसेच हटन आपल्या Caste in India या ग्रंथात जात या संकल्पनेची वैशिष्ठ्ये मांडताना म्हणतातए Normally Caste conforms to the following criteria : (i) A Caste is endogamous. (ii) There are restrictions on commensuality between members of different castes. (iii) There is a hierarchical grading of the Brahman at the top. (iv) In various kinds of contacys, especially those concerned with food, sex and ritual, a member of a high caste is liable to be polluted by either direct or indirect contact with a member of a low caste. (v) Caste are very commonly associated with a traditional occupation (vi) A man's status is determined by the circumstance of his birth, (i.e. the caste in which he is born) unless he is expelled from his caste for some ritual offence. (vii) The system as a whole is always focussed around the prestige accorded to the Brahmins.[11] जातीसंस्थेच्या वैशिष्ठयांचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करता येईल.१.जात ही जन्माधिष्ठीत असून मृत्यूउपरांतही ती बदलत नाही किंवा नष्ट होत नाहीत.: जातीसंस्था ही कोणत्याही व्यक्तिला जन्मासोबतच प्राप्त होत असते बालकाचा जन्म ज्या मातापित्याच्या पोटीझालेला असेल त्यांचीच जात ही त्या बालकाला प्राप्त होत असते.२.समाजाची जातीनिहाय विभागणी एका जातीतून दूसया जातीमध्ये व्यक्तिला जाता येत नाही.३. जातीव्यवस्थेची उतरंड आहे ज्यामध्ये कधिही वरती जाता येत नाही.४.कनिष्ठ जातींतील व्यक्तिंना सामाजिक व धार्मिक क्षेत्रातून जाणिवपुर्वक दूर ठेवण्यात आले.५. व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य जातीव्यवस्थेतील लोकांना मिळत नाही.६.सामाजिक संबंध सहभोजन व वैवाहीक संबंधावर नियंत्रण ठेवण्यात येते.७.सामाजिक व धार्मिक बंधने आणि विशिष्ठ समाजाला विशेषाधिकार.

: हिंदु धर्माने जातीच्या भिंती निर्माण केल्या, धर्मशास्त्राच्या आधारावरच भारतातील जातीव्यवस्था फोफावली, असा निष्कर्ष डॉ.आंबेडकरांनी आपल्या अध्ययनातून मांडला. ते स्पष्टपणे म्हणतात की, "वर्णभेद आणि जातिभेदाचे रक्षण करण्यासाठी हिंदू धर्मशास्त्राची रचना झाली. लोकांच्या आचरणाची मूलधारा धर्मशास्त्र आहे. जातीभेद,वर्णभेद,अधिकारभेद आणि अस्पृश्यता इत्यादी वाईट गोष्टींना नष्ट करण्यासाठी मौलिक उपाय म्हणून धर्मशास्त्राचा विरोध आणि त्या विरूध्द घृणा याचा प्रचार करायला पाहिजे. कारण हिंदू धर्मग्रंथ हेच जातिभेद आणि वर्णभेदाच्या पवित्रतेचा प्रचार करतात."[१२] या सोबतच डॉ.आंबेडकर या निष्कर्षाप्रत येतात कि, "जाती मोडण्याचा खरा उपाय म्हणजे आंतरजातीय विवाह होय. जातीपासून मुक्त होण्यासाठी दुसरा कोणताही उपाय उपयुक्त ठरणार नाही."[१३]

**समारोप :**

भारतीय जातीव्यवस्थेवर अनेक विचारवंतांनी व समाजशास्त्रज्ञांनी आपली मते व विचार मांडलेले आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे जातीव्यवस्थेचे चटके स्वत: अनुभवलेले असल्यामुळे या जातीव्यवस्थेचे गुणदोष किंचित जास्त स्पष्टपणे ते मांडतात. जन्मास आलेला प्रत्येक मानव हा समान दर्जाचा असून जे हक्क वरच्या वर्गातील लोक उपभोगतात ते अधिकार समाजातील सर्वात खालच्या दर्जाच्याही व्यक्तिचे आहेत. भारतातील ही वर्णव्यवस्था व्यक्तिच्या कोणत्याही गुणांवरती आधारीत नसुन ही व्यवस्था जन्माधिष्ठीत असल्याचे मत डॉ.आंबेडकर मांडतात. भारतीय जातीव्यवस्थेच्या संदर्भात डॉ.आंबेडकर यांनी अतिशय गाढा अभ्यास केलेला आहे.जातीव्यवस्थेतील अनेक तथ्ये त्यांनी उजेडात आणलेली आहेत.त्यांच्या या अभ्यासामुळे

ISSN : 2348-7143
February-2019

जातीविषयक अभ्यासाला एक नवा आयाम प्राप्त केलेला आहे. समाजातील अनेक विचारवंतांनी अनेक उपाय सुचवलेले आहेत मात्र ते उपाय वरवरचे आहेत. तर डॉ.आंबेडकरांनी जातीव्यवस्थेच्या मुळावर घाव घालणारा उपाय सुचवलेला आहे व हा उपाय आजच्या वस्तुस्थितीला धरून असल्याचे दिसून येते.

संदर्भ सूची :


१. एस.व्ही.केतकर. History of Caste in India, Rawat publications, Jaipur, Reprinted in 1979, Page No.12-15
२. प्रा.सोमवंशी वी.सी.भारतीय जातीसंस्थेत मातंगाचे स्थान आणि महारमांग संबंध आनंद प्रकाशन जयसिंगपुरा औरंगाबाद १९८९ पृ.९
३. डॉ.केतकर व्ही.एस. महाराष्ट्रीय ज्ञानकोश विभाग १४ पृ.११४
४. CASTES IN INDIA Their Mechanism, Genesis and Development DR. BABASAHEB AMBEDKAR WRITINGS AND SPEECHES VOL. 1, Compiled by Vasant Moon Publisher: Dr. Ambedkar Foundation Ministry of Social Justice & Empowerment, Govt. of India 15. Janpath, New Delhi, Re-printed by Dr. Ambedkar Foundation : January, 2014 PAGE No.6-7
५. एस.व्ही.केतकरए History of Caste in India, Rawat publications, Jaipur, Reprinted in 1979 Page No.12
६. कित्ता Page No.15
७. Moon Vasant (Compiled) Dr. Babasaheb Ambedkar : Writings And Speeches, Vol. 5 Book Ii-Social,Chapter 16 The House The Hindus Have Built First Edition By Education Department, Govt. Of Maharashtra: 14 April, 1989 Re-Printed By Dr. Ambedkar Foundation : January, 2014 Page.No.१५८
८. Dr.B.R.Kamble, Caste and Philosophy in pre-Buddhist India, Parimal Prakashan, Aurangabad, 1979, page no.10 to 15
९. Moon Vasant (Compiled) :CASTES IN INDIA Their Mechanism, Genesis and Development DR. BABASAHEB AMBEDKAR WRITINGS AND SPEECHES VOL. 1, Publisher: Dr. Ambedkar Foundation Ministry of Social Justice & Empowerment, Govt. of India 15. Janpath, New Delhi, Re-printed by Dr. Ambedkar Foundation : January, 2014 PAGE No.6-7-9
१०.Hutton J H Caste in India, Oxford University press, London, Second Edition, 1951,
११.Page No.45-91
१२.Ghurye G.S., Caste and Race in India, Kegan Pauk, Trench, Trubner & Co., LTD.,
१३.London, 1982, Page No.2-27
१४.Moon Vasant (Compiled): Annihilation of Caste DR. BABASAHEB AMBEDKAR WRITINGS AND SPEECHES VOL. 1, Part-1 Publisher: Dr. Ambedkar Foundation Ministry of Social Justice & Empowerment, Govt. of India 15, Janpath, New Delhi, Re-printed by Dr. Ambedkar Foundation : 1979 PAGE No.68
१५.Moon Vasant (Compiled): Annihilation of Caste DR. BABASAHEB AMBEDKAR WRITINGS AND SPEECHES VOL. 1, Part-1 Publisher: Dr. Ambedkar Foundation Ministry of Social Justice & Empowerment, Govt. of India 15, Janpath, New Delhi, Re-printed by Dr. Ambedkar Foundation : 1979 PAGE No.67